# खरीखुरी माहिती मिळवा

## प्रिय गुंतवणूकदार,

गेल्या काही वर्षांपासून, तुमच्या अधिक जवळ येण्यासाठी नॅशनल स्टॉक एक्स्चेंजने (एनएसई) देशातील जवळजवळ प्रत्येक भागात रोख्यांचे ऑनलाईन ट्रेडिंग सुरू केलेले आहे. गुंतवणूकदारांच्या हितसंरक्षणासाठी आम्ही करीत असलेल्या प्रयत्नांच्या अनुभवातून, आम्ही तुम्हाला, तुम्ही पाळाव्यात अशा काही चांगल्या प्रथांविषयी सांगू इच्छितो. तुमच्या तक्रारी कमी होण्यासाठी तसेच या एक्स्चेंजवरील व्यवहारांना एनएसईने लागू केलेल्या गुंतवणूक संरक्षण निधी अंतर्गत संरक्षण मिळण्यासाठी या मार्गदर्शक सूचनांची तुम्हाला बरीच मदत होईल.

## एनएसईवर व्यापारी देवघेव करण्यासाठी सुरक्षाविषयक मार्गदर्शक सूचना

रोख्यांची खरेदी–विक्री फक्त सेबीकडे नोंदणी केलेल्या एनएसईच्या दलालांकडूनच किंवा त्यांच्याशी संलग्न सेबीकडे नोंदवलेल्या सब–ब्रोकर्सकडूनच करा. सर्व एनएसई ब्रोकर्स आणि सब–ब्रोकर्सनी आपापली सेबी नोंदणीकरण प्रमाणपत्रे, त्यावरील त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता, त्यांचे सेबीकडील नोंदणी नाव वगैरे तपशिलासहित, त्यांच्या ट्रेडिंग सुविधा ज्या ज्या स्थळी उपलब्ध असतील अशा सर्व स्थळी प्रदर्शित करणे आवश्यक आहे. आपण एनएसई ब्रोकर आहोत असे सांगणाऱ्याकडे तुम्ही जाल तेव्हा या गोष्टींकडे लक्ष ठेवा.





''नो युवर क्लाएंट'' प्रपत्रात आपला सर्व तपशील देण्याची खात्री करा आणि नंतर ''क्लाएंट– ब्रोकर'' करारावर सही करा.

लक्षात ठेवा, ज्यावेळी तुम्ही शेअर्स खरेदी करण्यासाठी किंवा विकण्यासाठी मागणी नोंदविता त्यावेळी एकच एक ऑर्डर क्रमांक तयार केला जातो आणि ज्यावेळी ट्रेड (देवघेव) होतो त्यावेळी प्रत्येक ट्रेडसाठी एकच एक ट्रेड क्रमांक तयार केला जातो. कॉंट्रॅक्ट नोटमध्ये (करार टिपणात) हे क्रमांक येतील याची खातरजमा करा. कृपया हे क्रमांक नीट नोंदवून ठेवा.



व्यवहार झाल्यावर तुमच्या ब्रोकरकडून कामकाजाच्या 24 तासांच्या अवधीमध्ये तुम्हाला कॉंट्रॅक्ट नोट मिळेल याची खात्री करा.

व्यवहाराचा अस्सलपणा तपासण्यासाठी एनएसईच्या वेबसाईटवर लॉग इन करा आणि http://www.nseindia.com/content/equities/eq_trdverify.htm या URL वर जा. तुमच्या ब्रोकरने दिलेल्या कॉंट्रॅक्ट नोटवरील संबंधित माहिती भरा. या सुविधेमुळे सर्व अस्सल व्यवहारांची पुष्टी होईल आणि ट्रेडच्या दिनांकापासून 5 दिवसांपर्यंत ती उपलब्ध असेल.



तुमच्या ब्रोकरकडे तुमची वचनपूर्ति करण्यासाठी शेअर्स सुपूर्द (डिलीव्हर) करताना डिलीव्हरी निर्देश तुमच्या ब्रोकरच्या निर्देशित खात्याकडेच केले असल्याची खात्री करा. जर तुम्हाला तुमच्या खरेदीच्या व्यवहारपूर्तीसाठी तुमच्या ब्रोकरला पैसे द्यावयाचे असतील तुमच्या स्वतःच्या बँक खात्यावर अकाऊंट पेइ धनादेशांद्वारे द्या.

धनादेश ब्रोकरचे जे नाव कॉंट्रॅक्ट नोटवर किंवा दर्शनी भागावर लावलेल्या सेबी नोंदणी प्रमाणपत्रावर असेल त्या नावाचा असावा.



रोख रकमेद्वारे पैसे देणे टाळा कारण लेखापरीक्षेत त्याचा माग राहीलच असे नाही. काहीही असले तरी जर रक्कम रु. 20,000 पेक्षा जास्त असेल तर तुम्ही फक्त धनादेशाद्वारेच पैसे देणे बंधनकारक आहे.

तुमच्या ब्रोकरकडून व्यवहारापोटी तुमचे पैसे/डिलीव्हरीज पे आऊट दिनांकापासून कामकाजाच्या पहिल्या दिवशी मिळतील याची खात्री करा.

तुमच्या ब्रोकरकडून तुम्हाला तुमच्या खात्याचे विवरण 6 महिन्यांमधून किमान एकदा किंवा त्याहून अधिक वेळा मिळायलाच हवे. परंतु तुम्ही तुमच्या खात्याच्या विवरणाचे समायोजन तत्परतेने करायला हवे. फक्त एका गोष्टीची खात्री करा की तुम्ही आपल्या स्वतःच्या नावाने व्यवहार करून नंतर धनादेश मात्र कुटुंबियांच्या / मित्रांच्या बँक खात्यांचे देऊ नका. तसेच डिमॅट डिलिव्हरी इन्स्ट्रक्शन स्लिप तुमच्या स्वतःच्या डिमॅट खात्यातील असावी आणि कुटुंबियांच्या वगैरे खात्यांची असू नये.



कॉंट्रॅक्ट नोटमध्ये वगैरे काही त्रुटी असल्यास त्या ताबडतोब ब्रोकरच्या लेखी निदर्शनास आणा (त्याची पावती घ्या) व त्यांची लगेच दुरुस्ती झाल्याची खातरजमा करा.

जर तुमच्या तक्रारीची सोडवणूक तुमच्या ब्रोकरकडून वाजवी कालावधीत (उदाहरणार्थ 15 दिवसांमध्ये) झाली नाही तर ती एक्स्चेंजच्या गुंतवणूकदार तक्रार निवारण कक्षाच्या निदर्शनास आणा. तक्रारीचे प्रारूप मिळविण्यासाठी व ती एनएसईकडे दाखल करण्याच्या पद्धतीसाठी तुम्ही एनएसई वेबसाईट www.nseindia.com, URL : www.nseindia.com/content/assist/asst_invcentre.htm लॉग ऑन करू शकता.





एक्स्चेंजच्या गुंतवणूकदार तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल करताना कॉंट्रॅक्ट नोट्स, पैसे भरल्याचा/शेअर्सच्या डिलीव्हरीचा पुरावा वगैरे सर्व संबंधित कागदपत्रांच्या प्रती तुम्ही तक्रारीसोबत सादर करणे महत्त्वाचे आहे. पुरेशा कागदपत्रांअभावी तक्रार निवारण करणे अवघड जाते हे कृपया ध्यानात घ्या.

***या मार्गदर्शक सूचना तुमच्या फायद्यासाठी आहेत.***
***या जाहिरातीचे कात्रण तुमच्या संदर्भासाठी काढून ठेवण्यास विसरू नका.***

**नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड**
''एक्सचेंज प्लाझा'', बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई–400 051.
फोन : 91-22-26598100-8114. फॅक्स : 91-22-26598120. ई–मेल : cc_nse@nse.co.in
कृपया आम्हाला भेटा आमच्या वेबसाइटवर www.nseindia.com जनहितार्थ एनएसई द्वारा प्रकाशित.

A B and U-gf